# "छत्रपती शिवाजी महाराज यांची धर्मनिती"

**डॉ. जनार्दन श्रीकांत जाधव,** सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग, म. ह. शिंदे महाविद्यालय, तिसंगी. ता. गगनबावडा जि. कोल्हापूर. मो.९२८४८३४६७५, ९४२१५८६८५१ ईमेल: jadhavjj01@gmail.com

---

**सारांश:**

भारताच्या इतिहासामध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांचे कार्य आणि कर्तृत्व सर्वार्थाने वेगळे होते. छत्रपती शिवाजी महाराजांचे राजकीय कार्य जितके महत्त्वाचे होते. त्याहीपेक्षा छत्रपती शिवाजी महाराजांनी सामाजिक जीवनामध्ये जे धोरण राबवले ते खऱ्या अर्थाने क्रांतिकारक आणि राष्ट्र निर्मितीचे होते. त्यांनी स्वराज्यांमध्ये सामाजिक समता, सामान न्याय, समान संधी, धार्मिक स्वातंत्र्य आणि स्त्रियांच्या सन्मानाचे धोरण राज्यकारभार करत असताना अवलंबले. जात, धर्माच्या पलीकडे जाऊन शिवरायांनी मध्ययुगीन कालखंडात सर्वसामान्य रयतेचे स्वराज्य स्थापना केले. त्यांच्या हे स्वराज्य लष्करी अथवा प्रशासकीय व्यवस्थेवर आधारित नव्हते तर ते आठरापागड जातीतील निष्ठावंत मावळे आणि शिवरायांची उदात्त धर्मनीती यावर आधारित होते. शिवरायांचा सर्व जाती, धर्माकडे पाहण्याचा उदार आणि व्यापक दृष्टिकोन आणि निरपेक्ष धार्मिक धोरण हा शिवचरित्रातील अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. त्यांनी स्थापन केलेल्या स्वराज्यास हिंदवी स्वराज्य असा शब्दप्रयोग केला. याचाच अर्थ भारतीय होय. जो वंश, धर्म, जात या सगळयांच्या पलीकडे जाऊन धार्मिक सहिष्णुतेची आणि राष्ट्रीयत्वाची दृष्टी देतो. शिवरायांचा लढा हा राजकीय असून तो धार्मिक कधीच नव्हता. शिवरायांची वैज्ञानिक दृष्टी, सर्व जाती धर्मातील साधू-संतांच्या विषयीचा आदर,, हिंदू धर्माबरोबरच इतर धर्म स्थळांच्या विषयीची पवित्रतेची भावना, स्त्रियांच्या सन्मान, विशेषत: मुस्लिम सैन्य, अधिकारी, राजकीय सहकारी, मुस्लिम साधू, संत, पीर, दर्गा, मशिद, मुस्लिम धर्म आणि धर्मग्रंथ यासंदर्भातील त्यांचा विशाल दृष्टीकोन पाहिला असता शिवरायांची धर्मनीती किती उदात्त स्वरूपाची होती हे लक्षात येते. थोडक्यात, छत्रपती शिवाजी महाराजांचे हे धार्मिक धोरण म्हणजे धर्मांधतेच्या डोळयात अंजन घालणारे आणि सम्यक दृष्टी देणारे होते असे म्हणता येईल.

**प्रस्तावना:**

क्षत्रियकुलवंत, सिंहासनाधीश्वर श्री राजा शिवछत्रपती ही बिरूदावली छत्रपती शिवाजी महाराजांना राज्यभिषेकानंतर प्राप्त झाली. आणि खऱ्या अर्थाने रयतेच्या स्वराज्याची स्थापना झाली. "एक मराठा पातशहा एवढा छत्रपती झाला ही गोष्ट सामान्य झाली नाही" अशा पद्धतीचे उद्गार कृष्णाजी अनंत सभासद यांनी आपल्या बखरीमध्ये काढले. एक आदर्श पुत्र, एक आदर्श राजा, सावध नेता, कुशल संघटक, उत्तम प्रशासक, हिकमती लढवय्या, सज्जनांचा कैवारी, दुर्जनांचा कर्दनकाळ आणि एका नव्या युगाचा निर्माता म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांचा उल्लेख केला जातो. मानवी कल्याणाची भूमिका घेऊन त्यांनी आठरापगड जातीतील आणि विविध धर्मातील लोकांना एकत्र करून स्वराज्याची स्थापना केली. शिवरायांचे स्वराज्य हे सामाजिक समता, धर्मसहिष्णूता, वैज्ञानिक दृष्टी, जातीभेदास प्रखर विरोध आणि मानवी कल्याणाचा विचार या लोकशाही मूल्यांच्यावर आधारित होते. त्यामुळेच ते दीर्घकाळ टिकले.

आजपर्यंत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या वरती बऱ्याच इतिहास संशोधकांनी शिवाजी महाराजांच्या आयुष्यातील अनेक घटना प्रसंग आणि त्यांच्या ध्येयधोरणावरती भरभरून लिखाण केले आहे. त्या अनुषंगाने छत्रपती शिवाजी महाराजांचे धार्मिक धोरण या अनुषंगाने म्हणावे तितकेसे लिखाण झालेले दिसत नाही. छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवचरित्रातील अत्यंत महत्त्वाचा भाग म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांचे सर्वधर्म समभाव हे धोरण होय. त्यांनी स्थापन केलेल्या स्वराज्यास त्यांनी हिंदवी स्वराज्य असा शब्दप्रयोग केला याचाच अर्थ भारतीय होय. जो वंश, धर्म, जात या सगळयांच्या पलीकडे जाऊन धार्मिक समानता आणि राष्ट्रीयत्वाची दृष्टी देतो.

शिवाजी महाराज जसे हिंदू धर्माभिमानी होते तसेच ते इतर धर्मियांचा आदर करणारे होते. त्यांनी कधीही आपल्या धर्माभिमानास तलवारीची जोड दिली नाही. धर्मासंदर्भात त्यांची दृष्टी स्पष्ट आणि स्वच्छ होती. याहून शिवरायांचे धर्म आणि राजकारण या संदर्भातील धोरण किती भिन्न आणि वेगळ्या पद्धतीचे होते याची स्पष्टता येते. शिवाजी महाराजांचा हिंदूधर्माबद्दलचा पुरोगामी आणि वैज्ञानिक दृष्टिकोन, अस्पृश्यतेला केलेला क्रियाशील विरोध, कर्तबगारीची कदर, व्यवहारातील वस्तुनिष्ठता यामुळे व्यक्ती म्हणून शिवराय महान ठरतात. शिवरायांचे मुस्लिम सैन्य, अधिकारी, राजकीय सहकारी, मुस्लिम साधू, संत, पीर, दर्गा, मशिद, मुस्लिम धर्म आणि धर्मग्रंथ यासंदर्भातील त्यांचा उदार आणि विशाल दृष्टीकोन त्यांच्याकडे होता.

प्रस्तुत संशोधनपर निबंधमध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांची धर्मनीती आणि सर्वधर्मातील लोकांना स्वराज्याच्या प्रशासन व्यवस्थेमध्ये सामावून घेऊन निधर्मी राज्याची केलेली स्थापना या अनुषंगाने त्यांच्या धार्मिक धोरणावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

**उद्देश:**

१)छत्रपती शिवाजी महाराजयांचे धार्मिक धोरण समजावून घेणे.

२)छत्रपती शिवाजी महाराज यांचे मुस्लिम धर्मियांच्या संदर्भातील भूमिका समजून घेणे.

३)छत्रपती शिवाजी महाराज यांची राजकीय आणि धार्मिक भूमिका समजून घेणे.

३)छत्रपती शिवाजी महाराजांची सर्वधर्मसमभाव राज्याची संकल्पना समजून घेणे.

**गृहीतके:**

१)सतराव्या शतकातील छत्रपती शिवाजी महाराजांची धर्मनिती आणि सामाजिक समतेचे धोरण आजच्या काळात सुद्धा उपयोगी ठरते.

**संशोधन पद्धती:**

सदरच्या संशोधन प्रबंधासाठी ऐतेहासिक विश्लेषात्मक पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला आहे. सदरच्या संशोधन प्रबंधासाठी प्राथमिक तसेच दुय्यम संदर्भ साधने, नियतकालिकातील लेख इत्यादींचा उपयोग करण्यात आलेला आहे.

**हिंदवी स्वराज्याची स्थापना:**

शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या स्वराज्याला हिंदवी स्वराज्य असे संबोधले. वंशदर्शक, पददर्शक किंवा धर्म, जातदर्शक शीर्षक न देता हिंदवी म्हणजे भारतीय अशी अत्यंत व्यापक संकल्पना स्वीकारली आणि ती प्रशासन व रयत यांच्या मनामध्ये जाणीवपूर्वक रुजविली.[१]

समकालीन परिस्थिती लक्षात घेता, यावेळी संपूर्ण भारतामध्ये मुस्लिमांची राजकीय सत्ता होती. तसेच वेगवेगळया प्रांतामध्ये स्थानिक मुस्लिम राजकीय सत्ता असल्याच्या दिसून येतात. यामध्ये विशेषत: निजामशाही, कुतुबशाही, इमादशाही, बारीदशाही, आदिलशाह अशा नावाने ओळखल्या जात होत्या. मात्र छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेले स्वराज्य हिंदवी स्वराज्य या नावाने ओळखले गेले. हिंदवी हा शब्दप्रयोग कोणत्याही जातीशी धर्माशी संबंधित नसून ती एक व्यापक भौगोलिक संकल्पना आहे. एका विशिष्ट भौगोलिक प्रदेशात राहणाऱ्या लोकांचे राज्य म्हणजे हिंदवी स्वराज्य होय. हिंदवी स्वराज्य म्हणजेच भारतीय हा अर्थ त्यातून प्राप्त होतो. आणि म्हणूनच आधुनिक भारताचा पाया छत्रपती शिवरायांनी घातला असे म्हटले जाते. कोणत्याही जाती, धर्माच्या पलीकडे जाऊन शिवरायांनी स्थापन केलेले हे हिंदवी स्वराज्य हे खऱ्या अर्थाने निधर्मीय स्वराज्य होते असे म्हणता येईल.

**अठरापगड जातींचे संघटन म्हणजे हिंदवी स्वराज्य:**

छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्वराज्य म्हणजे बहुजनांचे राज्य होते. शिवरायांच्या स्वराज्यामध्ये आठरापगड जातीतील लोकांचे संघटन झाले होते. जात, धर्म, पंथ, भेदापलीकडे जाऊन स्वराज्य ही संकल्पना शिवाजी महाराजांनी रयतेत रुजवली होती. म्हणूनच ते दीर्घकाळ टिकले आणि रयतेला आपले वाटले. स्वराज्याच्या या निष्ठावंत मावळयांच्यामध्ये विविध जाती, धर्माच्या लोकांचा सामावेश होता. त्यामध्ये विशेषत: मानकोची दहातोंडे, यसाची कंक, तानाजी मालुसरे, बाजीप्रभू देशपांडे, बहिर्जी नाईक, संभाजी कावजी, जीवा महाल, काजी हैदर, दौलतखान, सिद्धी हिलाल, मदारी मेहतर, मोरोपंत पिंगळे, हंबीरराव मोहिते, सूर्यसेन काकडे, मारुती घोरपडे, फिरंगोजी नरसाळ, यालाजी मांग, रायनाक महार हे सर्व नावे पाहिल्यानंतर आपल्या लक्षात येईल की, त्यामध्ये उच्च कुलीन मराठे मावळे, हेटकरी, ब्राह्मण, प्रभू, रामोशी, महार, मांग, कोळी, भंडारी इत्यादी अनेक जाती, जमाती सोबतच मुस्लिम धर्मांचा देखील समावेश होता. त्यामूळेच शिवरायांचे स्वराज्य म्हणजे सर्व सामान्य रयतेचे राज्य होते असे म्हटले जाते.[२] जिथे प्रत्येकाला कर्तबगारीनुसार योग्य ती संधी आणि सन्मान प्राप्त होत होता. उदा: रायनाक महार हा छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात वतनदार होता. ही वतनदारी त्यांनी आपल्या कर्तबदारीवरती प्राप्त केली होती. म्हणजेच व्यक्ती कोणत्याही जातीची किंवा धर्माची असू दे त्याला त्याची योग्यता सिद्ध करण्याची संधी स्वराज्यात मिळत होती. परंपरागत वतनदारीला आणि श्रेष्ठ-कनिष्ठ या धार्मिक विषमतावादी विचाराला मूठ माती देऊन शिवाजी महाराजांनी निष्ठावंत मराठा मावळयांचे राज्य स्थापन केले होते आणि म्हणून ते दीर्घकाळ टिकले.

**वैज्ञानिक दृष्टिकोन असणारा राजा:** छत्रपती शिवाजी महाराज यांनी आपल्या राज्यात हिंदू धर्मातील अनिष्ट धार्मिक संकल्पनांना धारा दिला नाही. धर्माच्या नावाखाली दांभिकता, भुताटकी, तंत्रविद्या व पाखंडी वृत्ती वाढू नये याबाबतीत

शिवरायांनी दक्षता घेतली होती.[३] त्यांचा प्रत्येक घटनेकडे पाहण्याचा दृष्टिकोन हा वैज्ञानिक होता. हे विविध प्रसंगातून दिसून येते. त्यांनी कधीही शुभ-अशुभ या संकल्पना स्वराज्यामध्ये थारा दिला नाही. त्यांची प्रत्येक मोहीम ही शुभ-अशुभ दिवस किंवा चांगला वाईट मुहूर्त न पाहता सुरू होत असत. विशेषतः प्रत्येक मोहिम ही अमावस्येच्या काळयाकुट्ट रात्री निघत असलेल्या दिसून येतात.

छत्रपती शिवाजी महाराजांनी कधीही वास्तुशांती किंवा सत्यनारायण यासारखे पूजापाठ केल्याचे शिवचरित्रमध्ये निदर्शनास येत नाही. म्हणजेच धार्मिक खुळचट कल्पनांना शिवरायांनी आपल्या स्वराज्यात थारा दिलेला नव्हता. एवढेच नाही तर शहाजी महाराजांच्या मृत्यूनंतर सती जाण्यास निघालेल्या आपल्या मातोश्रींचे मन वळून सती जाण्यापासून प्रवृत्त करणारा आणि सती प्रथेला मुरड घालणारे शिवाजी महाराज हे भारतातील पहिलेच राजा होते असे म्हणता येईल. आग्रा सुटकेवेळी आपला जेष्ठ पुत्र संभाजी जिवंत असताना रायगडावर त्यांचा अंत्यविधी करणारा जगाच्या पाठीवरचा एकमेव तर्कबुध्दी आणि दूरदृष्टी असणारा राजा म्हणजे शिवाजी महाराज होय. तर पुत्र राजाराम पालथा निपजला म्हणून स्वराज्य पालथे घालील असे म्हणणाऱ्या धर्मपंडितांना माझा पुत्र राजाराम दिल्लीची पातशाही पालथी घातल्याशिवाय राहणार नाही असे बाणेदार उत्तर देणारे शिवाजी महाराज हे किती सकारात्मक विचारांचे आणि काळाच्या पुढे पाहणारे होते. ही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. वरील सर्व प्रसंगावरून एक गोष्ट लक्षात येते की, छत्रपती शिवाजी महाराज हे धर्मांध विचारांचे किंवा धार्मिक अनिष्ट प्रथा परंपरांच्यामध्ये अडकणार नव्हते. तर वैज्ञानिक दृष्टिकोन, तर्कबुध्दी प्रसंगावधान आणि दुरदृष्टी ठेवून निर्णय घेणारे महान राजे होते.

**शिवरायांची सर्वधर्म समभाव दृष्टी:**

छत्रपती शिवाजी महाराज हे धर्मनिरपेक्ष राजे होते. विचार आणि वारसा त्यांना त्यांच्या वडिलांच्याकडून मिळाला होता. शिवाजी महाराजांचे आजोबा मालोजीराजे यांनी श्रीगोंद्याचे शेख महमंद यांचा गुरुउपदेश घेतला होता. त्यांची पत्नी दीपाबाई यांनी अहमदनगरच्या शहाशरीफ समाधीस पुत्रप्राप्तीसाठी नवस बोलला होता. त्यामुळेच शिवाजी महाराजांच्या वडिलांचे नाव शहाजी तर त्यांच्या चुलत्याचे नाव शरीफजी असे ठेवण्यात आले होते. इतकेच नाही तर छत्रपती शिवाजी महाराजांचे वडील शहाजी महाराजांनी इसवी सन १६३६ मध्ये दादोजी कोंडदेव यांच्या तैनातीस एक हजार घोडेस्वरांची तुकडी दिली हाती. त्याचा सेनापती हा सिद्धी हिलाल होता. म्हणजेच इतर धर्मविषयीचा उद्दात दृष्टिकोन शिवाजी महाराजांना वडिलांच्यापासूनच मिळाला होता. तर माता जिजाबाई यांच्याकडून रामायण, महाभारतातील कथांच्यामधून नैतिकतेच्या विचारांचे संस्कार झालेले होते. याचाच परिणाम म्हणून शिवरायांनी सर्व जाती, धर्माच्या विद्वानांना आपल्या राज्यांत आश्रय दिला होता. सर्व धर्मांचा आदर आणि विद्वत्तेचा सन्मान या उच्च गुणांची परंपरा वारसा हक्काने त्यांना प्राप्त झाली होती. त्यांनी ती तशीच पुढे चालू ठेवली.[४]

शिवरायांचा राज्य हे खऱ्या अर्थाने निधर्मीय राज्य होते. त्यांच्या राज्याचा प्रमुख कधीही पंडित किंवा पुरोहित नव्हता. राज्याचे प्रशासन हे अष्टप्रधान मंडळाच्या माध्यमातून चालत होते. अष्टप्रधान मंडळातील लोकांशी सल्लामसलत करून लोकशाही पद्धतीने राज्यकारभार केला जात होता. थोडक्यात, शिवाजी महाराजांनी मध्ययुगीन काळात आपल्या राज्यात लोकशाही शासन व्यवस्था निर्माण केली होती. असे म्हटले तर अतिशोक्ती होणार नाही.

शिवाजी महाराजांनी सर्वच जाती-धर्मातील साधुसंतांचा आदर केला. संत तुकाराम, समर्थ रामदास, चिंचवडचे मोरया गोसावी, चिंतामणी देव, चाकणचे सिद्धेश्वरभट बह्मो, महाबळेश्वरचे गोपाळभट, केळशीचे बाबा याकूत, नीश्चलपुरी गोसावी, पाटगावचे मौनी बाबा, पोलादपुरचे परमानंद बाबा, वडगावचे जयराम स्वामी, चिंचवडचे नारायण देव, धामणगावचे बोधले बाबा, ब्रह्मनाळचे आनंद मूर्ती, बारामतीचे त्र्यंबक नारायण बुवा अशा कितीतरी साधू संतांच्या विचारांचा प्रभाव त्यांच्यावरती होता. यातूनच त्यांचे धार्मिक विचार आणि दृष्टी व्यापक बनलेली दिसून येते.[५] शिवराय हे हिंदू धर्माभिमानी असले तरी इतर धर्मांचा सन्मान करणारे होते. त्यांनी हिंदूंबरोबरच मुस्लिम साधू-संतांचा आणि पवित्र स्थळांचा आदर आणि सन्मान केला. हिंदू मंदिरांच्या बरोबर मुस्लिम दर्यांना सुद्धा त्यांनी उदारहस्ते इनाम दिले. हिंदू धर्म ग्रंथाप्रमानेच मुस्लिमांच्या कुराण ग्रंथाचा त्यांनी मान ठेवला. त्यांनी कुराण ग्रंथास आसमानी किताब व ईश्वराची वाणी असे संबोधले. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या धार्मिक धोरणाची प्रशंसा करत असताना काफीखान हा इतिहासकार लिहितो की, "शिवाजीने सैन्याकरीता नियम केला होता की, सैनिक ज्या-ज्या ठिकाणी लूट करण्यास जातील तेथे त्यांनी मशिदीस, कुरणास अथवा कोणत्याही स्त्रीस त्रास देऊ नये. जर एखाद्याच्या हाती कुराण ग्रंथाची प्रत आली तर त्याबद्दल पूज्यभाव दाखवून तो आपल्या मुस्लिम बांधवांच्या स्वाधीन करीत असे."[६] यावरून शिवाजी महाराजांचा इतर धर्माकडे बघण्याचा दृष्टिकोन किती विशाल आणि पवित्र होता हे दिसून येते.

शिवरायांच्या आयुष्यामध्ये घडलेल्या अनेक प्रसंगावरून शिवरायांच्या धार्मिक धोरणाची कल्पना आपणास येते. विशेषतः अफजल खान वधाचा प्रसंग, अफजल खान वधाचा प्रसंग हा राजकीय संघर्ष असून तो धार्मिक नव्हता. कारण अफजल खान वधाच्या प्रसंगी शिवरायांच्या बाजूने बोलणे करणारा वकील काजी हैदर ही मुस्लिम व्यक्ती होती. ज्या वाघानाख्यांनी वध करण्यात आला ती वाघनखे बनवणारा रुस्तम- ए -जमान हा मुस्लिम होता. तर वधाच्या प्रसंगी छावणी बाहेरील सैनिकांना थोपवून धरणारा शिवरायांचा अंगरक्षक सिद्धी इब्राहिम हा सुद्धा मुस्लिम होता. तर सय्यद बंडाचा हात वरच्यावर कलम करणारा जीवा महाल हा नाभिक समाजाचा होता. याउलट औरंगजेबाच्या बाजूने वकिली करणारा आणि प्रसंगी शिवाजी महाराजांच्यावरती तलवारीचा वार करणारा कृष्णाची भास्कर कुलकर्णी हा हिंदू होता. ज्याचे शिवाजीने एका घावात दोन तुकडे केले. वरील प्रसंगा वरून छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्य हे कशा पद्धतीने निधर्मीय होते हे लक्षात येते. स्वराज्याच्या आड येणारी व्यक्ती कोणत्याही जातीची, धर्माची असो त्याचा मुलाहिजा केला जाणार नाही. असे ठणकावून सांगणारे शिवाजी महाराज होते. एवढेच नाहीतर अफजल खानाच्या वधानंतर छत्रपती शिवाजी महाराजांनी प्रतापगडाच्या पायथ्याशी स्वराज्याच्या खर्चातून इस्लाम धर्माप्रमाणे विधीपूर्वक त्याचे दफन केले. आणि तिथे दिवाबत्तीची सोय लावून दिली ही गोष्ट लक्षात घ्यायला हवी. छत्रपती शिवाजी महाराजांच्या विशाल दृष्टिकोनाची आणि सहृदय अंतकरणाची साक्ष 'खतुते शिवाजी' या मुळ फारशी भाषेतील ग्रंथातील मजकुरावरून कळते. औरंगजेबाच्या जिझिया कराचा निषेध करताना शिवाजी महाराज लिहितात की, "इस्लाम आणि हिंदू धर्म हे दोन्ही परमेश्वराच्या स्वरूपाचे मधुर अविष्कार आहेत. मशिदीत परमेश्वराच्या स्मरण करण्यासाठी बांग देतात. मंदिरातील घंटानातद हा परमेश्वराच्या आराधनेसाठीच असतो. धर्माच्या बाबतीत द्वेष आणि कट्टरपणा दाखवणारा प्रत्येकजण परमेश्वराच्या अज्ञेविरुद्ध वागत असतो. म्हणजेच परमेश्वराने निर्माण केलेल्या या चित्रावर रेघोट्या ओढू पाहणे म्हणजे चित्रकारावर दोषारोप करणे असे आहे."[७] वरील पत्रातील मजकुरावरून छत्रपती शिवाजी महाराजांचा हिंदू आणि मुस्लिम धर्माच्या संदर्भात असणारी भूमिका किंवा धोरण स्पष्ट होते. कोणत्याही धर्माचा द्वेष छत्रपती शिवाजी महाराजांनी केला नाही. हिंदू धर्माचे रक्षण करण्याबरोबरच इतर धर्मांचा योग्य तो मान आणि सन्मान त्यांनी राखला. त्यासाठी त्यांनी हिंदू मंदिरांच्या बरोबरच मशिदींच्या दिवा-बत्तीची सोय सुद्धा केली होती**.** शिवरायांनी कधीच आपल्या धार्मिक धोरणाला धर्मांधतेची जोड दिली नाही. त्यांनी कधीच चर्च, दर्गा यांची विटंबना केल्याचे उदाहरण शिवचरित्रात सापडत नाही. या उलट हजरत पीर दर्गा आणि पंढरपूर देवस्थान यांना एकाच हेतूने आणि एकाच भावनेने धार्मिक सनदा दिल्याची अनेक उदाहरणे शिवचरित्रात जगो-जागी पहावयास मिळतात. नौकाबंदी, धर्मांतरबंदी सारखी हिंदूधर्मातील प्रथा मोडून शिवरायांनी स्व-धर्मातून पर धर्मात गेलेल्या नेताजी पालकर या शूरवीर नराला परत हिंदू धर्मात मानाने आणि सन्मानाने घेतले.[८] शिवरायांची ही कृती हिंदू धर्माभिमानी असण्याबरोबरच इतर धर्मांचा आदर करणारी होती. थोडक्यात, शिवरायांचे धार्मिक धोरण किती उच्च कोटीचे आणि निधर्मी होते हे लक्षात येते.

**शिवरायांचे मुस्लिम सैनिक:**

समकालीन परिस्थितीमध्ये शिवरायांचा लढा हा धार्मिक नसून तो राजकीय स्वरूपाचा होता. शिवरायांच्या एकंदरीतच लष्करी प्रशासनावरती नजर टाकली तर आपल्या लक्षात येईल की, शिवरायांचे लष्कर हे विविध जाती, जमातीतील लोक एकत्र येऊन बनलेले होते. विशेष करून शिवरायांच्या एकूण सैन्य संख्येमध्ये ३८% संख्या ही मुस्लिम धर्मीय सैनिकांची असलेली दिसून येते. इतकेच नाही तर शिवरायांच्या ३० अंगरक्षकापैकी १० अंगरक्षक हे मुस्लिम धर्माचे होते.[९] शिवरायांच्या सोबत असलेल्या या सर्वच मुस्लिम सैनिकांनी स्वराज्याची प्रामाणिकपणे सेवा केलेली दिसून येते. कोणत्याही मुस्लिम सैनिकांनी अथवा अधिकाऱ्यांनी दगाफटका अथवा गद्दारी केल्याचे उदाहरण शिवचरित्रात सापडत नाही.

शहाजीराजे यांच्याकडून वारसा हक्काने मिळालेला सिद्धी हिलाल शेवटपर्यंत शिवाजीच्या महाराज्यांच्या बाजूने लढत राहिला. "वेडात वीर दौडले सात" या वीरगती प्राप्त सैनिकांच्या पैकी सिद्धी हिलाल एक होता. तर स्वराज्याचा पहिला सरनोबत म्हणून नूरबेग यास सन्मान प्राप्त झाला होता. भारतीय आरमाराचे संस्थापक म्हणून शिवरायांना ओळखले जाते. त्यांनी डच, पोर्तुगीज, इंग्रज, फ्रेंच या परकीय सत्तांना रोखून धरण्यासाठी देशातील पहिले आरमार उभे केले. या आरमाराच्या प्रमुख पदाची जबाबदारी त्यांनी दौलतखान आणि दर्यासारंग या दोन मुस्लिम व्यक्तींच्यावरती सोपवलेली होती.[१०] त्यांनी स्वराज्याची अत्यंत निष्ठेने आणि प्रमाणिकपणे सेवा केली. म्हणजेच शिवरायांनी जात, धर्म न पाहता कर्तबगारी पाहून पद आणि प्रतिष्ठान दिली होती.

शिवरायांचा वकील काजी हैदर असो किंवा त्यांचा खाजगी चिटणीस मुल्ला हैदर असो यांच्यावरती शिवाजी महाराजांचा अत्यंत विश्वास होता. तर अफजलखान वधाच्या वेळेला छावणी बाहेरील सैनिकांना अडवून धरणारा सिद्धी इब्राहिम

शेवटपर्यंत शिवरायांच्या सोबत होता. इतकेच नाही तर आग्रा सुटकेच्या वेळेला शिवरायांचे पाय चेपत बसणारा मदारी मेहत्तर फरास असो की हवालदार सिद्धी अंबर वहाब असो किंवा शामाखान, हुसेनखान मियाना असो अशा कितीतरी कर्तबगार मुस्लिम सैनिकांनी मुघलांची अनेक ठाणी जिंकून स्वराज्यात आणल्याची कितीतरी उदाहरणे शिवचरित्रात सापडतात.[११] आदिलशाही सोडून आलेल्या सातशे पठानांना शिवरायांनी आपल्या स्वराज्यामध्ये मानाने आणि सन्मानाने घेतले. शिवरायांनी या सातशे पठाणांच्यावरती विश्वास दाखवून स्वराज्याची सेवा करण्याची संधी दिली.[१२] वरील सर्व घटनांच्यावरून शिवाजी महाराज यांचा दृष्टिकोन किती उदार आणि उदात्त होता हे दिसून येते. धर्म आणि राजकारण यांच्या पलीकडे जाऊन माणूस म्हणून व्यक्तीचा विचार करणारा हा मानवतावादी राजा होता. आज २१ व्या शतकामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या याच धर्मनितीची आणि निरपेक्ष धर्मसहिष्णू विचारांची गरज देशाला परत एकदा निर्माण झाली आहे.

**निष्कर्ष**

१) छत्रपती शिवाजी महाराज यांचे राजकीय आणि धार्मिक धोरण हे पूर्णपणे वेगळे आणि स्वतंत्र होते.

२)छत्रपती शिवाजी महाराजांनी आठरापगड जातीतील तसेच इतर धर्मातील लोकांना एकत्र करून बहुजनांचे राज्य स्थापन केले.

३)हिंदवी स्वराज्य स्थापनेमध्ये मुस्लिम लोकांचा सक्रिय सहभाग होता.

४) सामजिक समता हा छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याचा आधार स्तंभ होता.

५)छत्रपती शिवाजी महाराज हे पहिले राजे होते ज्यांनी आपल्या राज्यात लोकशाही मूल्यांची स्थापना केली.

६)धर्मनिरपेक्ष राष्ट्रभरणीच्या दृष्टिकोनातून छत्रपती शिवाजी महाराजांची धर्मनीती महत्त्वाची ठरते.

**संदर्भ:**

१)पठाण आय.एच., शिवरायांची धर्मनिती, मनोविकास प्रकाशन, पुणे, २०२३, पृ. २०.

२) उपरोक्त पृ. २८.

३)कुलकर्णी अ. रा., शिवकालीन महाराष्ट्र, हंसराज प्रकाशन, १९९७, पृ. ३०-३१.

४)पठाण आय. एच., उपरोक्त, पृ. १७.

५)पठाण आय. एच., उपरोक्त , पृ.२१.

६)कुलकर्णी अ. रा., देशपांडे प्रणव, मराठ्यांचा इतिहास, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे,१९९९, पृ.१०९.

७)केळकर य. ना., मराठे शाहीतील वेचक-वेधक, डायमंड प्रकाशन, पुणे, २००८, पृ.१९.

८) कुळकर्णी अ.रा., उपरोक्त, पृ. ११०.

९)गायकवाड-सरदेसाई-थोरात-हनमाने, मराठकलीन संस्था आणि विचार, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९९०, पृ. ३३४.

१०)द. वि.आपटे, रा. वि. ओतुरकर, महाराष्ट्राचा पत्ररूप इतिहास, भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे, पृ.२६-२७.

११) पठाण आय. एच., उपरोक्त , पृ.१००-१०५.

१२)लोहार एम.ए.(संपा.), मराठा कालीन समाज जीवन, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर प्रकाशन, २००७, पृ. ४०.